# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत जनमताचा कौल अभ्यासने

**प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख**
(सहाय्यक प्राध्यापक)
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड जि. नागपुर
Email: prashantdeshmukh114@gmail.com
Mob. No. :- 9923690033

---

***गोषवारा :***

*मध्य प्रदेशाच्या धर्तीवर राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना जाहीर केली आहे. राज्यातील दोन कोटी ८० लाख महिलांना या योजनेचा लाभ होणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने साठी चालू आर्थिक वर्षात ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून वित्त विभागाच्या संमतीनंतरच या योजनेला मंत्रिमंडळाने मजुरी दिली आहे, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना २०२४.२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात सादर केली आहे. वित्त आणि नियोजन, सर्व संबंधित विभाग तसेच राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतरच या योजनेची घोषणा अर्थसंकल्पात केली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिला मतदारांना आपलेसे करण्यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून हि योजना जाहीर केली आहे. निवडनुका जिंकण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून राज्य सरकारने नवनवीन लोकप्रिय घोषणा आणि निर्णयांचा धडाका लावला आहे. महिला मतदारांवर विशेष लक्ष केद्रित करताना नारी शक्तीला खूश करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्वपूर्ण योजनांची घोषणा अर्थसंकल्पातून केली आहे. या सर्व बाबी जरी खरी आल्या तरी प्रस्तुत विषयातुन संशोधकाने मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना मुळे महीलांची आर्थिक मदत होईल काय? मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना मुळे महीलांचा आर्थिक विकासास उपयुक्त ठरेल काय ? मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना मुळे सक्षम देश म्हणून वाटचालीस लागेल काय.? मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना सर्व महीलांसाठी खुली राहनार आहे का.? मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना सर्व महीलांसाठी ऑनलाईन पध्दतीच्या माध्यमातुन सहज सोयीची होईल काय.? मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना महीलांच्या विकासाची दिशा ठरवण्यास मदत होईल काय? मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांनाही तीन गैस सिलेंडर मोफत देण्याचा आग्रह शासनाणे धरला मात्र अशा योजना लागू केल्यामुळे लोकांची सरकारवर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती वाढेल का? तसेच अशा मोफत धोरणामुळे सरकारवरील आर्थिक भारावर मोठा परिणाम होईल काय? अशी भूमिका नियोजन आणि वित विभागाने घेतली तर मुख्यमंत्री माझी लाकडी बहीण योजनेतील लाभार्थ्यांनाही लाभ द्यायचा झाल्यास सरकारवर हजारो कोटींचा आर्थिक भार येईल काय? या आणि याहि व्यतीरिक्त अनेक प्रश्नाची उकल करण्या करीता मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना अंर्तगत जनमतांचा कौल प्रस्तुत संशोधन विषयाला धरुन संशोधन करण्याचे ठरवीले आहे.*

किवर्ड : लाडकी, बहीण, मुख्यमंत्री, योजना, आर्थिक.

---

**प्रस्तावणा :**

राज्यात *मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला* चांगला प्रतिसाद मिळत असून पात्र अर्जदारांच्या

निवडक खात्यात पहिल्यांदा एक रुपया जमा करण्याचा निर्णय महिला बालविकास विभागाने घेतला आहे. ही एक तांत्रिक पडताळणी आहे. मध्य प्रदेशाच्या धर्तीवर राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना जाहीर केली आहे. राज्यातील दोन कोटी ८० लाख महिलांना या योजनेचा लाभ होणार आहे. सध्या एक कोटी ८० लाख महिलांनी अर्ज भरलेले आहेत. ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. प्राप्त अर्जाची सध्या छाननी सुरू आहे. यातील पात्र महिलांना तांत्रिक पडताळणीसाठी बँक खात्यात एक रुपया जमा केलाजाणार आहे. रक्षाबंधनाच्या दोन दिवस अगोदर पात्र महिलांच्या खात्यात दोन महिन्याचे तीन हजार रुपये जमा केले जाणार आहेत त्यापूर्वी ही पडताळणी होणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी चालू आर्थिक वर्षात ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून वित्त विभागाच्या संमतीनंतरच या योजनेला मंत्रिमंडळाने मजुरी दिली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवारांनी दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्पष्टीकरणातुन पैसा कुठून आणणार हा प्रश्नच उदभवत नाही. अर्थ आणि नियोजन मंत्री म्हणून मी स्वत: मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना २०२४–२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात सादर केली आहे. वित्त आणि नियोजन, सर्व संबंधित विभाग तसेच राज्य मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतरच या योजनेची घोषणा अर्थसंकल्पात केली आहे त्यामुळे या योजनेसाठी पैसा आणणार कोठुन? हा प्रश्न उद्‌भवत नाही, असा खुलासा अजित पवार यांनी केला आहे. आर्थिक स्वातंत्र्य, पोषण व सर्वांगीण सक्षमीकरणासाठी स्वाभिमान, मान, सन्मान स्वावलंबनासाठी ही रक्कम खर्च करण्याची राज्य सरकारची तयारी आहे.

तसेच पुन्हा आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिला मतदारांना आपलेसे करण्यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जाहीर करण्यात आलेल्या मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची व्याप्ती वाढविण्याचा महत्वपूर्ण निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. त्यानुसार उज्वला योजनेतील लाभार्थ्या बरोबर मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील लाभार्थ्यांनाही वर्षाला तीन गैस सिलिंडर मोफत देण्यात येणार असून त्याचा फायदा किमान दोन कोटी महिलांना होणार लवकरच याचा निर्णय निर्गमित करुन अंमलबजावणी सुरू करण्याची तयारीही अन्न व नागरी पुरवठा विभागाने सुरू केल्याची माहिती प्रसारमाध्यमाकडुन होत आहे.

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची व्याप्ती वाढविली असुन सरकारवर चार ते साडेचार कोटीचा बोजा वाढला असला तरी अखेर या योजनेचा निर्णय घेण्यात आला आहे. आता माझी लाडकी बहीन या योजनेत समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात आजमितीस ३ कोटी ४८ लाख कुटुंबाकडे घरगुती गैस सिलेडर जोडली जानार आहे. त्यातील उपयोजनेतील ५२ लाख १६ हजार ४१२ लाभार्थी कुटुंबांना केंद्राच्या ३०० रुपये अनुदानावरील रक्कम राज्य सरकार देणार असून यासाठी वार्षिक ८३० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. मतदाराना खुश करण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून राज्य सरकारने नवनवीन लोकप्रिय घोषणा आणि निर्णयांचा धडाका लावला आहे. महिला मतदारांवर विशेष लक्ष केंद्रित करताना नारी शक्तीला खूश करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण आणि मुख्यमंत्री अन्नपूर्णा या दोन महत्वपूर्ण योजनांची घोषणा अर्थसंकल्पातून जाहीर करण्यात आली आहे. स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या इंधनाचा आणि महिलांच्या आरोग्याचा अगदी जवळचा संबंध आहे. महिलांच्या आरोग्याच्या तक्रारी कमी करायच्या असतील तर त्यांना स्वच्छ इंधनाचा पुरवठा करणे ही आपली जबाबदारी असल्याचे सांगत अर्थमंत्री अजित पवार यांनीपात्र कुटुंबाला वर्षाला तीन गैस सिलिंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना जाहीर केली होती.

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री उज्वला योजनेतील पात्र ५२ लाख १६ हजार ४१२ लाभार्थी कुटुंबांना या योजनेचा लाभ देण्याची घोषणाही त्यांनी केली होती. ही योजना राबविताना गॅस सिलिंडर पुरवठा करणाऱ्या कंपन्यांना तीन मोफतचे पैसे दिले जाणार असून प्रत्येक लाभार्थ्यांचा आधार लिंक केला जाणार आहे. त्यामुळे या योजनेचा गैरफायदा घेणाऱ्यांना लगाम लागेल असा दावाही अन्न व नागरी पुरवठा विभागातील सूत्रांनी व्यक्त केला. असा प्रस्ताव मंत्रिमंडळासोर ठेवला होता. उज्वला योजनेतील लाभार्थ्यांना केंद्र सरकार एका गैस सिलेंडरमागे ३०० रुपये अनुदान देते, तर एका गैस सिलेंडरची बाजारातील किमत ८२० ते ८६० रुपये असते. त्यामुळे एका सिलेंडरची सरासरी किंमत ८३० रुपये धरून प्रत्येक लाभार्थ्याला प्रति सिलेंडर ५३० रुपये याप्रमाणे तीन सिलेंडरच्या अनुदान देण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मांडण्यात आला होता. या वरुन असे दिसुन येते की शासनाच्या तिजोरीचा विचार न करता राज्यकर्ते मतदारांना आपलेसे करण्याचा घाट घालत आहे.

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी प्रभावी उपाययोजना :**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शासन स्तरावर दैनंदिन आढावा घेतला जात आहे. जिल्ह्यातही जास्तीत जास्त महिलांनी या योजनेसाठी नोंदणी करावी, यासाठी जिल्हाधिकारी यांनी लाभार्थी नोंदणी केंद्राला भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी उपविभागीय अधिकारी तहसीलदार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी व इतर अधिकारी उपस्थित राहुन मार्गदर्शन करीत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पीक विम्याला फटका मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मोठा फटका प्रधानमंत्री पीक विमा योजनेला लागला आहे लाडकी बहीण शेतकऱ्याना विमा कित्येक तास उभे राहावे लागत आहे परिणामी या योजनेच्या लाभापासून शेतकरी वंचित राहण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने पीक विमा योजनेस जुलैपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे शेतक—यांना मोठा दिलासा मिळाला आहे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश सरकारने यंत्रणांना दिले आहे. ग्रामीण भागात सेतु केंद्रातून महिलांची मोठ्य प्रमाणात गर्दी असून लाडकी बहीण योजनेला प्राधान्य दिले जात आहे.

**अध्ययन पद्धती :**

**अध्ययन क्षेत्र :** प्रस्तृत संशोधन नागपुर जिल्हयातील नरखेड शहर अध्ययनाचे क्षेत्र आहे.

**संशोधन साहित्याचे परिक्षण :**

संशोधन अधिक परिपुर्ण व वस्तुनिष्ठ तसेच विस्तुत व सखोल होण्यासाठी संशोधनाशी संबंधीत सहित्याचे परीक्षण किंवा अवलोकण होणे गरजेचे असुन संशोधन विषयाचे परिक्षण करणे अत्यंत महत्वाचे असते. संशोधन विषयाचे संबंधीत वेगवेगळे साहित्याचे परिक्षण किंवा अवलोकन केल्यामुळे संशोधनाचे उद्देश व संशोधनाची गुहितके यांची निश्चिती करून मुलाखत अनुसुची तसेच व्यष्टी अध्ययन यांचा आराखडा तयार करण्यास अतिशय सुकर झाले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने बाबत अनेक लेख, संशोधनाचा पर्ताळा करण्यात आला.

**संशोधन उद्देश आणि संशोधन प्रश्न :**

उद्देशाच्या आधारे संशोधनाला योग्य दिशादेता येईल. या सोबतच संशोधनाला मर्यादीत ठेवण्याकरीता उद्देश मदत करते. संशोधनाला जर उद्देश नसेल तर संशोधन दिशाहीन व्हायला वेळ लागणार नाही.

**संशोधन प्रश्न :**

1. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने मुळे महीलांची आर्थिक मदत होईल काय?
2. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने मुळे महीलांची आर्थिक विकासास उपयुक्त ठरेल काय ?
3. मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजने मुळे देश सक्षम वाटचालीस सुरवात करेल काय.?
4. मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना सर्व महीलांसाठी खुली राहनार आहे का.?
5. मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना सर्व महीलांसाठी ऑनलाईन पध्दतीच्या माध्यमातुन सहज सोयीची उपलब्ध होईल काय.?
6. मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजना महीलांच्या विकासाची दिशा ठरवण्यास मदत होईल काय?
7. मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यानाही तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याचा आग्रह शासनाणे धरला मात्र अशा योजना लागू केल्यामुळे लोकांची सरकारवर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती वाढेल का?
8. तसेच अशा मोफत धोरणामुळे सरकारवरील आर्थिक तिजोरीवर मोठा परिणाम होईल काय?

**संशोधन उद्देश :**

१. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अभ्यासने,
२. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्या मागचा शासनाचा उदेश जानुण घेणे,

**गृहितकृत्य :**

१. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा उदेश महीलांचा आर्थिक सहाय्य करणे आहे.
२. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्या मागचा शासनाचा उदेश महिला मतदारांना आपलेसे करण्याचा सहसंबध दिसुन येतो.

**नमुना निवड :**

प्रस्तृत संशोधनात नागपुर जिल्हातील नरखेड शहरातील निवडक नागरीक गैर संभाव्यता नमुणा निवड पद्धतीच्या आधरे उत्तरदाते म्हणुन निवड करण्यात आली.

**तंथ्य संकलणपद्धती व तंत्रे :**

प्रस्तृत संशोधनात मुलाखत अनुसुची व अंशता निरीक्षणाच्या आधारे तंथ्य संकलीत करण्यात आले.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत संशोधन उत्तरदात्यांच्या मतावरुन असा निष्कर्ष निघतोकी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना महिलांच्या विकासाकरिता राबविण्यात आली असली तरीही प्रस्तुत योजने करिता महिलांचा आग्रह नसतानाही राज्यावर अतिरिक्त कर्जाचा बोजा वाढून प्रस्तुत योजना शासनाने मतांच्या राजकारणाकरिता राबवण्याचा आटोकाट प्रयत्न चालू आहे. अनेक समस्या राज्यात तोंड वर काढून पाहत असताना सुद्धा त्याकडे दुर्लक्ष करून ही

योजना शासनाने राबवली आहे. अनेक समस्यांकरिता राज्याची जनता शासनाकडे मागणी करत असून त्या मागणीकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना नाही मिळाली तरी चालेल परंतु शेतकऱ्यांच्या मालाला भाव नक्की मिळालाच पाहिजे तर प्रत्येक शेतकऱ्याची मुलगी आपल्या वडिलांच्या डोळ्यात आनंद बघून नक्कीच त्यातच समाधानी होईल. सर्व महिलांच्या कल्याणाचा मार्ग एकच आहे असे समजणे चुकीचे आहे. एसटी बस उपलब्ध नसणाऱ्या शेतमजूर महिला खाजगी गाडीला लोंबकळत कामावर जातात. त्याच वेळी लाखभर पगार असणारी महिला अर्ध्या तिकिटात ऑफिसमध्ये जात असते. ही विसंगती धोरणकर्त्यांनी लक्षात घेतली पाहिजे. तसेच गॅस जोडणी महिलांच्या नावे असली तरच लाभ मिळेल. या अटींमुळे लाडकी बहीण योजनेचा लाभ साधारणत: अडीच कोटी महिलांना देण्याचा सरकारचा मानस असला तरी, मोफत गॅस सिलिंडरचा लाभ साधारणत: दीड कोटी कुटुंबांना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सरकारवर वार्षिक चार ते साडेचार हजार कोटींचा बोजा पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

शासनाच्या कर्मचा—यावर नियमित कार्यालयीन कामे करताना पडणारा ताण, त्यात सरकारतर्फे राबवण्यात येणाऱ्या लाडकी बहीण सारख्या योजनांचा भार आणि वर्षानुवर्षे प्रलंबित मागण्यांकडे राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष, यामुळे अनेक जिल्ह्यासह राज्यातील महसूल कर्मचारी चांगलेच वैतागले आहेत. या निषेधार्थ अनेक जिल्हयात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महसूल कर्मचारी संघटनेच्यावतीने निदर्शन करण्यात आली. कर्मचाऱ्यांनी शासनविरोधात घोषणाबाजी करून राज्य सरकारचा निषेध नोंदवला. तरीही या शासनाला अजुनही मुख्य समस्या कोनती आहे. कोणत्या समस्याना प्राधान्यक्रम दयावा हे कळत नाही आहे. या योजनेच्या लाभासाठी राज्यातील हजारो महिला अर्ज भरण्याच्या प्रक्रियेत गुंतल्या आहेत. यामुळे महसूल कर्मचाऱ्यांवरील भार वाढला असून शेतीच्या कामात अर्थळा निर्माण झाला आहे. त्याचा इतर योजनांची अंमलबजावणी मुख्य कामकाजावर प्रभाव पडत आहे. त्यामुळे जनतेला अनेक समस्याचा सामना करावा लागत आहे. ही वस्तुस्थीती आहे.

**संदर्भ :**


- रंणजित कुमार, संशोधन पद्धती, जानेवारी २०१७
- राष्ट्रसंत तूकडोजी महाराज,ग्रामगीता,श्रीगूरूदेव प्रकाशन गूरूकूज२०११
- शेतकरी मासीक
- योजना
- दैनिक लोकसत्ता
- pmyojanaadda.com/majhi-ladki-bahin-yojana-beneficiary-list/
- https://pmawaslist.in/ladki-bahin-yojana-online-apply/
- https://govtsoochna.com/mazi-ladki-bahin-yojana-official-website-link/